
भावकल्प
प्रद्युम्न

**दहावीत** शिकत असलेल्या एका मुलाने लिहीलेली ही लघु कादंबरी. एका भव्य कादंबरीचा शुभारंभ.

ही तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या महाकादंबरीच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं. ती महाकादंबरी सर्वार्थाने “महा” होण्यासाठी.

वाट पहातो. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र. आणी शक्य असल्यास प्रत्यक्ष भॆट. कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.


प्रद्युम राकेश चिलकेवार

39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर

भ्रमण ध्वनी -9307537644

ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com

## लेखक परिचय



प्रद्युम राकेश चिलकेवार 'कवि पूरब'.

वय- 16

39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर

शिक्षण- संजूबा हाय स्कूल 10 वी.

प्रथम पुस्तक 'आहुत्य' -

https://www.amazon.in/Ahutya-Pradyum-Chilkewar/dp/B09HR3MWD3/ref=mp_s_a_1_1?crid=4RAWN0GTZJUW&keywords=pradyum+chilkewar&qid=1638810466&sprefix=pradyum+chilkewa%2Caps%2C439&sr=8-1

Youtube channel - kavi purab

https://youtu.be/lWbMP6h4K1Y

भ्रमण ध्वनी -9307537644

ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# भावकल्प

(लघुकादंबरी)

लेखक : प्रद्युम पूरब

# भावकल्प

लेखक प्रद्युम पूरब
**भ्रमण ध्वनी -9307537644**
**ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com**
**पत्ता – 39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर.**

मुखपृष्ठ: प्रद्युम चिल्केवार

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : २९ मार्च २०२१,
( फाल्गुन कृष्ण द्वादशी १९४३ )

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखकाचे दोन शब्द –

फार छान वाटतं कि आयुष्यात अशी देखील लोकं मिळतात जे आपल्या कलेला प्रोत्साहन देतात. आणि ते मला मिळाले/ फार उत्कट आणि निराळ्या 'online' पद्धतीत - ई-साहित्य! माझ्याकडे बोलण्याइतपत अश्या काही मोठ्या गोष्टी नाहीत. केवळ आहे ते एक बालमन. थोडं विचित्र नि थोडं विचित्रच!

माझी आवड - वाचन आणि लेखन. कादंबऱ्या, काव्य नि कविता हेच माझे आई-वडील, गुरु आणि आयुष्य. कविवर्य बा.भ बोरकर हे माझे सर्वात आवडते कवी. शिवाय तुकोबांचे अभंग देखील माझे फार आवडते आहे. मला आताही माझ्या आठव्या वर्गातील असलेली सर्वात पहिली तुकोबांची संतवाणी - 'आम्हा घरी धनं शब्दांची रत्ने …' ही आठवते. नि आयुष्याची रूळ देखील याच आठवणीतील गुंतलेली आहे.

वाचकांनो, मला काही नकोय, फक्त तुमचा प्रतिसाद हवंय. लेखनातील तोटा, आपली मतं, लेखन, शब्द नि कल्पना आपणास कशी वाटली हे जर स्वतंत्रपणे कळले तर फारच छान!

धन्यवाद !

माझे मानस गुरुवर्य

श्री वि. स. खांडेकर

यांचे चरणी समर्पित.

प्रद्युम

# भावकल्प

1.

ती वाट चुकली असावी, जसं नाजुक पाखरं आसमंतातील चांदणं बघून त्यास झेप घेतो, या भ्रमात की चांदणं कदाचित मिळून जाईल, पण खरंतर वाट चुकतो ना, अगदी तसे! आपल्या आयुष्यात ना ‘का’ ‘कोण’ आणि ‘कशासाठी’ हे शब्द फारच जटिल असतात, आणि सामान्य सुद्धा! तुम्ही म्हणाल हे काय मधातच नवीन? ते ही अचानक? होय, अचानकच! शेवटी जीवनात काही गोष्टी अचानकच घडतात ना? काही सुंदर तर काही फारच दुःखदायी! मात्र या सर्व गोष्टींमागे हे तीन प्रश्न बाळगलीच असतात. ज्याचा शोध माणूस आजीवन घेत असतो, पण काही केल्या त्यांचं उत्तर त्याला सापडत नाही.

मी आज लिहितोय ते केवळ स्वतःसाठी. छे ! माझी ही कथा कुणाच्या मनाशी खेळणार नाही. आसवांच्या शाईत भिजून चिंब झालेली ही अक्षरे केवळ माझ्या ओलसलेल्या मनाच्या ह्रिदयातून या पातळ पानावर निमुळत कोरटली जात आहे. कारण आतून मला आवाज येतोय, सतत, क्षणात, कि हेच, “रे मित्रा, या मनावरचं सारं ओझं कुठेतरी हलकं कर. हे दुःख, हे अश्रू, हेच तुझं जीवन नाहीय! घे हे वही, घे हा पेन आणि लिही. जे दुःख आज तुझ्या ह्रिदयात सलत आहे त्याला या पानावर व्यक्त कर. होय मित्रा, उघडपणे, कोणता हि संकोच न करता, फक्त लिही. फक्त लिही !”

2

ती वाट चुकली असावी. मी मैदानात खेळत होतो. संध्याकाळ, अत्यंत रमणीय, व्यापक आणि सर्द होती. थंडीचे दिवस. अंगात उर्मी होती. तारुण्याची ज्वाला शिरली होती. मित्र माझे अत्यंत सरळ आणि भित्रे! मित्रमंडळात देखील शिवी द्यायला लाजत होते. जणू समोर मित्र नव्हे तर कोणी वडीलधारी जटाधारी मुलं उभी आहे! त्या सर्दीच्या दिवसात मी मैदानाच्या चौफावर उभा होतो. माझी नजर अचानक तिच्याकडे गेली! तिला बगताच मी स्तब्ध राहिलो !

"अरे, हे तर तेजू आहे! हे … किती दिवसानंतर !" मी मनातल्या मनात उद्गारलो. "काय दिसतेस! सहा वर्ष एकत्रित राहिलो, फार चांगली मैत्री होती. आजकाल दिसत नाही आणि भेटत पण नाही. काय करत असावी?" तो दिवस आठवला मला! संगीताच्या शाळेतून घरी परतत होतो आम्ही. मुसळधार पाऊस कोसळला! मला होती घाई, पण तिला जणू काय झाले काय ठाऊक? मी विमानाच्या गतीने सायकल चालवत होतो, पण ती! हळू हळू , पावसात भिजत भिजत, आभाळाला प्रेमळ नजरेनं बघत, जणू स्वतःशीच पावसांच्या नाजूक थेंबांशी गप्पा मारीत, क्वचित हसत, जसें पाखरू हसतात ना , अगदी तसे !

"मुलगी वेळी आहे खरंच! इथे इतका पाऊस आणि हि? हिला भिगायचे आहे? वाह ! अगं तेजू !! चल ना !"

काहीच ऐकलं नाही तिने. मी दहा पंधरा हाका मारल्या, पण नाहीच! शेवटी तिच्या जवळ गेलो.

दोन क्षण बघतच राहिलो. मग म्हटलं- “चलती आहेस कि जाऊ मी ?”

काहीच नाही बोलली. मी हात पकडला नि म्हटलं - “गं बाई, चल ना !”

दोन पावलं पुढे गेली, तिसऱ्या पावलात माझा हात जो तिच्या हाताला गुंतलेला होता तो क्वचित स्तब्धला. एक नीर्मीशी ओढ आली मला, जणू कोणी खेचलं. पूर्ण देह सरसावला, तिच्याकडे! आणि .., आणि बघताच …क्षणार्धात,...ओठांना ओठ स्पर्श झाले!

# 3

ते स्वप्न नव्हतं ना…? 🤔. छे! स्वपनच असावं! माणसाच्या मनातल्या त्या नाजूक भावनांशी  संलग्न हे स्वप्नेच असतात! जे एक क्षणभरच का होईना, स्वतःला त्या कल्पनाच्या सुंदर आणि मधुररम्य जगात नेतं ज्याने असं वाटतं की हे जीवन देखील फार निराळं आहे. आयुष्याच्या या निस्तब वाटेवर चंद्रफुले विसावणारी पाकळी म्हणजेच तर माणसाची आशा असते. आयुष्याला जन्म देणारी- अवनी, आयुष्य जगायला शिकवणारी- बुद्धी, अर्थ देणारी- सुख-दुःखाची पाकळी, पण काही अपेक्षा ही न बाळगता फक्त निरपेक्ष कामना आणि जगण्याची इच्छा उदभवणारी कळी म्हणजेच-ती आशा होय! नि या आशेला जन्म देते, तेच आपलं छोटंसं-इवलंसं ‘स्वप्न!’

मला न वेडच लागलंय कि काय कोणास ठाऊक? या वयात हे मी का लिहितो आहे, कोणास ठाऊक? मला तर नाहीच नाही, पण जर तुम्हाला ठाऊक असेल न त मला नक्की कळवा हं! बरं….! आता लेखणीकळे वळूया.

“ऐकतीस? ओ…. तेजूबाई! कुठंय लक्ष तुमचं?” मी खेळकर शब्दात उद्गारलो.

“काय म्हणता पूरबराव? सर्व ठीक तुमचं?”

“ठीक तर नाही गं सध्या…, जीवन फार भ्रमवंश्चक भासू लागलाय मला!” मी मुद्दामून काहीतरीच बोलू लागलो.

“काय वाटू लागलाय? भ्र…, भ्रम...वंशक?” प्रश्नार्थक हावभावाच्या लयीत तिने विचारलं.

“वंशक नाही रं पोरी…, वंश्चक! ‘भ्रमवंश्चक’ म्हणजे- ‘स्म्भ्रमीतव्याकुळभ्रमपरीगत विचारमुद्रा!”

“बाबाबाबाबाबाबा...बाप रे बाप! एक तर तू नि तुझी हे भाषा! लेखक होणार आहेस का रे तू?”

“अरे बिलकुल! लेखकच होणार आहो मी!”

“मग कोणावर पुस्तक लिहिशील? स्वतःवर? की मग माझ्यावर?” तिने हसत प्रश्न केला.

“दोघांवर!” मी बोललो.

“अच्छा? मग काय लिहिणार हो लेखक महोदय तुम्ही ‘आपल्या दोघांवर’?”- तिचा पुन्हा हसरा नाद.

“प्रेम कथा लिहीन, मस्तपैकी!”

“काय?”

“हो! त्यात काय एवढं?”

“प्रेमकथा? आता अती होत आहे यार!”

“चल असू दे हे सर्व. उद्या आपण डोंगरी चाललो, तू येत आहेस ना?”

“हो, मी पण येतच आहे. कित्ती दिवस झाले कुठे गेलेच नाही. असं वाटतं की घरी बसून बसून मी पाषाणच झाले कि काय?”

“कदाचित…, झाली असेल. असेल काय, तुझ्याकडे बघून वाटते तेजूबाई, झालीच आहे!” मी हसत हसत तिची चिढ काढली.

“पूरब!” तिने माझ्या हासऱ्या शब्दाला प्रत्युत्तर म्हणून तिच्या चेहऱ्यावरच्या हावभावाने कटाक्ष टाकला. मला ते फार आवडलं! हेच तर ते छोटी छोटी आनंद देणारी क्षणं असतात!

“असो गं, चेष्टा करतोय तुझी! एवढं पण नाही कळत तुला?”

“चेष्टा चाले, पण देहचेष्टा नाही. अजिबात नाही. कळलं?” कदाचित ती रागावली होती.

“हो गं बाई.., नाही करणार यापुढे,” मी म्हटलं, “असो. चल आता घरी जाऊ. नाहीतर तुला घरी बोलवेल.”

“नाही रे, थांब ना! मला वेळ आहे खूप. इतक्या दिवसानंतर घराच्या बाहेर निघाले, जरा बघू दे हे सांध्यचित्र!”

“तुला संध्याकाळ बघायची आहे, पण इथे? या प्रदूषित शहरात?” मी आश्चर्याने प्रश्न केला.

“हो, तर?”

मी क्षणभर विचार केला. अचानक, माझ्या अंगी एका धाडसी शक्तीने संचार केला. ते का केलं,मला ठाऊक नाही. पण पुढच्याच क्षणी मी एक शब्द उद्गारलो- “चल!”

“कुठे?” तिने विचारलं.

“चल!”

“अरे पण कुठे?”

“गाडीवर बैस!”

“कशासाठी?”

“काम आहे.”

“कुठलं?”

“इथेच जवळपास. बैस!”

“ठीक आहे.”

दोघांनी त्या वाहनावर भरगच्च देह सरसावून घेतलं. मात्र मी वाहन कुठल्या तरी वेगळ्याच दिशेने पळवू लागलो. असे होताच माझ्या मागे बसलेली ‘एक भित्री’ व्याकुळ होऊ लागली. व्याकुळ काय ते प्रश्नांचे बाणच मारू लागली.

“ए वेड्या, अरे कुठे नेतोय? अरे बोल ना! जवळपास सांगून किती दूर आलो! अरे काही सांगशीन का? ए पूरब! ए बधिरा! अरे थांब ना रे पोरा! ‘ए पोट्ट्या!!’”

बोलू दे! बडबडू दे! पण मी मात्र काहीच लक्ष दिलं नाही. सुमारे ऐंशीच्या वेगाने वाहन धावत होतं. कारण वाहन चालवणारा मी होतो, माझ्या हाती वाहन म्हणजे विमान!

काही जास्तच वेगाने गाडी चालत असल्यामुळे तिचे केस वीरखळले असतील हे माझ्या ध्यानी आलंच नाही. किमान फक्त अळीच मिनिट लागले, नि मला जिथे जायचे होते ते ठिकाण आले. शहरापासून काही दूर नव्हतं ते ठिकाण. चला, हिला कसेतरी आणले तेच फार मोठी गोष्ट होती.

"ए पोट्ट्या !!! कित्ती वेगाने तू..."

'तू' या शेवटच्या शब्दावर मी रोख दिली, आणि लगेच तिची मान समोरच्या दृश्याकडे निमुळती केली. दोघ्यांच्या विचलित मुद्रा त्या दृश्याकडे बघताच सौम झाल्या, शांत पाण्याप्रमाणे. आणि दोघांची डोळे भान हरवून, एकटक, त्या दृश्याकडे अगदी विरून गेली, सृष्टीच्या अभूसौंदर्यात विसावून गेली, जसे मेघ एक मेकांत विसावतात ना, अगदी तसे!

"सांध्यछाया! या अरुंद वाटेवर उभं राहून समोरच्या क्षितिजाला बघून मनात काय येतं गं?"

"सृष्टीकर्त्यांने त्याच्या कल्पचित्रात किती वेळगे, किती निरागस, किती सुंदर अशे रंग भरले आहेत! कधी कधी हे जीवन देखील फार सुंदर भासू लागतं! हो ना रे पूरब?"

"नक्कीच! ही सांध्यछाया! आभाळाच्या विशाल तरंगावर पसरलेली ही सूर्याची उष्ण लालिमा! जणू पृथ्वीलोक सोडून जात असता पाणावली आहे, म्हणून तिचे उष्ण किरणे देखील किती सौम झालीत!"

“याच सौम किरणांच्या मधुपंखात मेघ देखील कित्ती प्रसन्न आणि पुलकित होतात! या सौम किरणांच्या नाजुक स्पर्शाने जणू ते डोलू लागतात!- या थंड वायूच्या मंद लयीत!”

“हो! ही एकलयवायू! किती अभय आहे न! कुठलं ही भय न बाळगता, अगदी बिंदस्त होऊन साऱ्या सृष्टीचं भ्रमण करते! हिचा स्पर्श होताच अंगातील चराचर जणू प्रकाशाच्या जगात दीप्त होऊन जातात! दोन क्षण, अगदी दोन क्षण स्पर्श करणारी ही वायू…! असं वाटते, हे देह सोडून द्यावं नि आजीवन या वाहणाऱ्या संथ आणि सर्द वाऱ्यात विलीन होऊन जावं!”

“त्या मेघांप्रमाणे?”

“हो! त्या मेघांप्रमाणे! बघ तर…., ते हसरे ढगं! आपल्याला जणू बघून चेष्टा करत असावे!”

“चेष्टा? कसली चेष्टा? अरे…, ते कसली चेष्टा करणार? त्यांचं लक्ष पृथ्वीतळावर नसून ते तर विमग्न (अर्थात-भानरहित. निमग्न-भानयुक्त) झाली आहेत!”

“विमग्न?”

“होय! बघ तरी! ते मेघ या सांध्यछायेत घट्ट नसून, वितळ झालेत! या ढगांची अभ्रकोर मावळत्या सूर्यकिरणांना स्पर्श करू बघतात! अरे ते तर विलीन सुद्धा झालेत! एक-मेकांच्या देहात विसावून जाऊन देहस्पर्शाचा मनसोक्त आनंद घेत आहेत ते! त्यांना तर त्यांचा स्वतःचाच भान नसावा, ते कसली आपली चेष्टा करणार?”

“अस्सं व्हय! पण सूर्यकिरणे तर लोप पावली.”

“तर काय झालं? अभ्रकोर देखील अभ्रात किरणांसोबत लोप पावली!”

“पण प्रकाश अजूनही दिसतोय!”

“हेच तर या सांध्यछायेचे वैशिष्ट्य आहे!”

“ए.!!! ते कुठलं पक्षी आहे बघ तर!”

“अरे! तो तर मदूत पक्षी म्हणावा!”

“मदूत? हा कुठला पक्षी आहे गं? हे कुठल्या साहित्यात वाचलं तू?”

“पूरब, हे नाव कुठल्या साहित्यात नाही.”

“मग?”

“हे पक्षी माझ्या कल्पनांत आहे! ‘मदूत’ म्हणजे तो पक्षी जो ढगावर राहत असतो! जगात फक्त एकच असा पक्षी आहे.”

“आणि तो कुठे? तर तुझ्या कल्पनांत!”

“हो तर! त्यात काय झालं? ए पण थांब! तुला हा पक्षी कसा दिसला रे?”

“सांगू?”

“सांग ना!”

“कारण तू मला माझ्या कल्पनांत दिसतेस.”

“काय म्हटलं?”

“अरे काही नाही! सोड ते असू दे!” विषय जरा बदलवला!, “हि संध्याकाळ बघून न मला गीत सुचलंय तेजू!”

“मग बोल ना!”

“द्रवळतो गंध, मधुरमंद-
जशी सुरभीत-प्रीत- हे रंग- मिसळले मेघ मदूतापरी,
बघून जाहले काळ मगभंग, मग्न हे अंग,
द्रवळतो गंध.”

“मला काहीच नाही कळलं रे!”

“मला वाटलंच!”

“हो ना! मी लेखक नाही ना. वाचन पण मला जास्त नाही येत! तू अर्थ पण सांग न पूरब.”

“बघ.-’या सांध्यछायेत सर्वभोवती एक सुगंध दरवळतो आहे! हे सुगंध किती मधुर आहे! किती गोड आहे, ज्याला स्पर्शीताच जणू आपण मंद झालो, मधुरमंद झालो! कोणाप्रमाणे? तर त्या प्रीती प्रमाणे, जे देखील सुगंधयुक्त झालीय! त्यालाच सुरभीत-प्रीत असं म्हटलंय! नि हे संपूर्ण कल्प एक रंग झाले, जे कि सर्वभूत पसरले, मिसळले-आपल्या रुचिरात, जसा मदूत मेघात मिसळतो ना! मग हे सर्व कल्प काळ बघतो, म्हणजेच हि वेळ, हा काळ हे सर्व रंग बघता बघता मगभंग म्हणजेच भानाला भंग करतो, नि

मग्न होतो. माझे अंग देखील हे सर्व चित्रण बघून मग्न होतं, कारण हे गंध द्रवळतं!'

"बाप रे! काय कल्पना करतोस रे! मी पण एक ओळ तयार केलीय!"

"अरे वा! बोल न!"

"उत्फुलली अंतरीस पुलकळी, पुलकमय लळी,
चांदणी निशा-प्रेमची तृषा-कोवळी कळी
चालला चंद्र,
चंद्र मदमंद, देह अवचंब
द्रवळतो गंध."

"तेजू..!? हे तू तयार केली?! विश्वास नाही गं!"

"खरं सांगू? मला पण विश्वास नाही होतंय."

"कवयित्री झालीस कि काय?"

"मला काय ठाऊक? पण छान म्हटलं ना मी?"

"छान तर म्हटलंच, आता अर्थ पण सांग कि!"

"अ….., मला नाही येत", निरपेक्ष स्वरात "तूच सांगशील काय? तू तर लेखक आहेस, तू तर अर्थ सांगूच शकतोस!"

“बघ. तुझ्या ओोळीप्रमाणे अर्थ असा निघतोय कि...या सांध्यचित्रात तुझ्या अंतरी नर्मिष जागी झाली, ज्याप्रमाणे आनंदाने बहरून गेलेल्या अरविंद फुलाची कळी पहाटेच्या वेळी पुलकित होऊन जाते, त्याप्रमाणेच तुझ्या अंतरी एक लळा लागला, जे नर्मिष जागी झाली ते अरविंद पुष्पाच्या पुलकित कळीप्रमाणे पुलकमय झाली. आणि समोर तर अशी कल्पना आहे की आभाळात मंद गतीने चाललेल्या चंद्राला आणि या चांदण्याला बघून तुझी नर्मिष प्रेम करायला बघती आहे, जशी कोवळी कळी बघतेस ना, कदाचित तसंच! मग शेवटी तू माझीच कल्पना चोरली- माझे अंग देखील….!”

“असू दे रे! तू माझी मदत पक्ष्याची कल्पना चोरू शकतोस, अजून मी एक ओळ घेतली तर त्यात काय झालं?”

“असो गं बाई, क्षमस्व.”

“अरे! हे नर्मिष म्हणजे काय? हे कुठल्या साहित्यात आहे?”

“कवी पूरब च्या ‘भावकल्प’ या भावबंध पुस्तकात!”

“हे पुस्तक मला कुठे मिळणार?”

“अगं, esahitya.com वर जा की!

“पूरब, हे नर्मिष म्हणजे काय रे ?”

“नर्मिष- म्हणजे उद्भवलेली असून,स्वतःला ही न प्रकट होणारी ती स्वतःचीच भावना.”

[मग दोघे ही सोबत गाऊ लागतात]

“नयनपरी केवळ दिसते रंगक्षितिज, पुलकीत-प्रीत

क्षण हीच रीत, क्षण हेच क्षितिज-कल्पना चोह वितरंग,

कशी लागली सांध्य तुज छंद!

द्रवळतो गंध.”

4.

पहाटेचा सूर्य उगवला, ठरल्याप्रमाणे दोन कुटुंबांची स्वारी एकाच गाडीहून आनंद-मौजेच्या उल्लासमग्न मनाने डोंगरी निघाली. गाडी चालवणारी माझी आई होती, तिच्या बाजूला सोबती आलेल्या कुटुंबाच्या स्त्री, म्हणजेच तिची आई बसून गप्पा गोष्टी करत होत्या. दोन कुटुंबातील सांख्यिक मुलं-मुली, मी-माझी बहीण हे पहिल्या कुटुंबाचे दोन गणिक, ती आणि तिचा भाऊ हे दुसऱ्या कुटुंबाचे दोन गणिक मोजून (दोन गुणिला दोन) म्हणजे आम्ही चार गणिक, शिवाय दोन कुटुंबातील दोन कुटुंबाचे दोन वेगवेळगी स्त्री, म्हणजे आमच्या दोन कुटुंबांच्या दोन आया, म्हणजेच (चार बेरीज दोन) मिळून आम्ही सहा लोकं होतो! 😅

असो. गवाक्षाच्या बाहेर नजर गेली कि वृक्षांची रांग सतत त्यांच्या प्रसन्न मुद्रेने मला देखील प्रसन्न करत होती. मी आणि ती, आम्हा दोघांमध्ये दोन गणिकांचा, म्हणजेच माझ्या आणि तिच्या बहिण भावाचा ‘देहाक्षेप’ होता, शिवाय दोघे हि त्यांच्याच कसल्यातरी भुरसट गोष्टींमध्ये गुंतले होते. हे बरे म्हणायचे! प्रवासाच्या वेळी प्रवासाचा खरा आनंद केवळ निसर्गाची सोबत राखली तरच येतो. यांच्या सौंदर्याला बघणे, त्यास सुंदर कल्पना करणे, मग त्या कल्पनाच्या स्वविश्वात स्वतःला रमवणे, नि जर आयुष्यात या हृदयाला जपणारी कुणी आपुलकीची व्यक्ती असली, कि त्याला पण त्या कल्पनात रमवून घेऊन प्रीत करणे, ही बालमानासारखी निरागस क्षणं देखील या जीवनाच्या आनंदी क्षणाच्या गणतीत विसावून

जातात! अशीच एक कल्पना मला देखील सुचली! थोड्याच अल्प वेळासाठी का होईना, उघळलेल्या एकटक त्या आसमंताकडं बघणाऱ्या डोळ्यांनी एक बालमनच माझ्यात तयार केले!

'प्रीतकल्पना!'

आभाळात जाऊ !

आज मन वरं-वरं उडू-उडू पाहू
ए , चल ना ! आभाळात जाऊ !

उंच न उंच ती एकच भरारी
रेशिमच्या धाग्यांवर घेतली सवारी

बघुनी आम्हाला हसला अरविंद
लहरत आहे बघ प्रेमाचा गंध

"ढगाळी आभाळं , झोक्याचा वारा
पुलकित झाला हृदयाचा किनारा !"

“रे मित्रा ! उरात स्फुंदनं भर की !
भर्रारून ढगांच्या अंगात चल की !”

सर्रारी-भर्रारी गर्रारून फिरलो
क्षणात ढगाळी विश्वात शिरलो !”

सांगावयास मी शब्द ऐटवले
पण बघतो ते काय ! तू  डोळेच मिटवले !!

“या नटलेल्या सृष्टीचं सौंदर्य बघ ना !
गं ए ..! भित्रे !  डोळे उघड ना !”

“पाकळी -पंखीळ -कंठीत कोकीळ
चंद्राळी आभा , ते किरणांची गाभा”

“ते निळे आकाश, ते गुलाबी थेंबं
अन लिपलीप करणारे चांदणे बिंबं !”

“बघून तुला थट्टीत करतंय !

गालातल्या-गालांत मिश्किल हसतंय !”

उघडताच डोळे तू किती घाबरली
अन कळत न कळता पण मला आदळली

मग बघताच खाली तू पुन्हा हादरसील
“खरंच गं प्रिये ! तू कित्ती घाबरलीस ?”

अंगात अंग, मी झालो अचंब
मिसळला सुगंधात रंगाचा गंध ?
कि दोन देहांचा तो एक-प्रतिबंब!

प्रिये !
“आला हा क्षण, हा  प्रेमाचा ऋतू
उतून जातसे लावण्य उतू  !”

5

“पूरब! पूरब!!” ऐकताच कल्पना भंग झाली. हि माझी बहीणच मला उठवत होती, “काय रे पूरब, प्रवासाच्या वेळी देखील झोपत असतो!”

“ते मी…..” माझे शब्द अडथळले.

“हो ना, नुसता झोपतच असतो झोपरा कुटला!” हा टोमणा मला त्या कोपऱ्यात बसलेल्या मुलींन मारला! आता या वेडीला कसं सांगावं की तुझीच कल्पना करत होतो मी,

मी लगेच उत्तर दिलो, “तुला टोमणं मारायची काही गरज?”

“तर? आळशी लोकांना टोमण्याशिवाय काही दुसरं औषध नसतं!” तिने तिच्या शब्दातून एक तिरपा कटाक्ष टाकला.

“अच्छा! तर मी आळशी, हो नं?”

“नाही काय? मग उठ आणखी चल थोडं वातावरण दुरुस्त कर बरं! चल एखाद शायरी म्हण…”

“शायरी व्हय! अरे मग माझी माता, शायरी बोलवून घ्यायची असता आळशी म्हणायची काही गरज होती का?”, मी हास्यस्पद शब्दांत उद्गारलो, “चल असो, क्षमा केलं तुला! खुश राहा- तथास्तु पुत्री!”

“पाय लागू आजोबा!” तिने देखील समोरून माझी चेष्टा केली.

“ए!!!”

“शायरी सुरू नाही झाली अजून…, बोल न रे भाव खाया!”

“हा! सर्वे ऐका!” -

अर्ज किया है.... “ये जिंदगी बड़ी ताज्जुब रे मौला!

मुझको तेरी मिल्कियत समझ नही आती

ये...

“अरे थांब थांब शायर” मला मधेच तिने रोख दिली, “आम्ही गरीब माणसं! आम्हाला काही कळलं पाहिजे असं काही तरी बोल!”

“बरं. मग अर्ज़ किया है...

“न मिली, न मुकम्मल हुई, न बसर हुई वो बात

बस शराब की बूंदो में ही गुजर गयी वो रात!”

“वाह वा! वाह वा! कुछ इश्क़ पर सुना दो!

“अपने हुस्न पर ज़्यादा इतरा रही हो क्या ?

हमपर ये जिस्म आज़मा रही हो क्या?

बहुत मगरूर है तुम्हारी आँखें झूँठ बोलने में

बहुत, मगरूर है ये तुम्हारी आँखें, झूँठ बोलने में !

सच कहो, हमसे घबरा रही हो क्या?”

“ए पोट्ट्या!!” -पुन्हा तिचा तान्हा हसरा स्वर!

मौला! मैं क्यों अब ज़िंदगी से सिफ़ारिश करु?
“मैं अब भोला नही रहा जो दुनिया से ख्वाहिश करु
अगर ये जलील दुनिया किसी दिन मुझे मिल जाए
तो इसको और जलील करने की मै सौ बार साज़िश करु

हर क़र्ज़ का हिसाब रखना पड़ता है अल्लाह !
अब वक्त ऐसा के दोस्तों से भी डरना पड़ता है अल्लाह
है खूबसूरत ये दुनिया, है खूब-ए-जन्नत तेरे करिश्मे
मगर जीने के लिए बुरा तो बनना पड़ता है अल्लाह!

“आज के लिये ईत्ता काफी!” मी स्वतः शायरीतून भानावर आलो.

अशीच गप्पा मस्ती चालली, वेळ कधी निघाला काही कळलंच नाही. शेवटी आम्ही डोंगरीच्या विस्तृत गावी पोहचलो. वाहन कुठे लावायचं हे प्रश्न आले, कारण डोंगरी हे एक गाव आहे, कुठलं तरी पर्यटनस्थळ आहे असं या गावाला बघून अजिबात वाटत नव्हतं. अगदी शांत, एकटं, पातळ रस्त्याच्या सर्वकिनारी उंच उंच जंगली कदंब वृक्षांनी रापूट गेलेलं किर्र असं अरण्य दृष्टीस येत होतं. घनदाट झाडे, अरण्याचा तो शांत गुंजर, आणि हे गुंजर ऐकून मनात येणारी ती भीती. बहुतेक हे डोंगरी नसावी. इतकं भयाण जंगलाचं चित्र बघून या जंगलात पशु-पक्षी वास करतात याची अनुभूती मला त्या क्षणीच झाली होती. शिवाय मन देखील घाबरत होतं. या ठिकाणी काही तरी भयाण प्रसंग आपल्या सोबत घडणार आहे अशी भीती मला आतून वाटू लागली. पण मला ते व्यक्त करता आली नाही.

“हे कुठूनही पर्यटनस्थळ वाटत नाही,” मी उद्गारलो.

“मी माहिती काढली होती, हे एक पर्यटनस्थळच आहे. जंगल सफारी म्हणून हे फार विख्यात आहे.” बहीण म्हणाली.

“कोणाकडून माहिती काढली होती? या आधी कोणी आलं आहे काय इथे?”

“अरे मी भ्रमणध्वनीवरून माहिती काढली होती. या आधी इथे कोणी आपल्या ओळखीचं कोणी आलं नसावं.”

“अच्छा असो. मी माहिती काढतो. आदी, चल बरं बघू थोडं.” त्या दुसऱ्या गणिकाचे नाव आदी होते.

चोहीकडे दृष्टी वळवली, तरी पर्यटकांसाठी मार्गदर्शक सूचना देणारं असं सूचनास्तंभ किंवा बोर्ड कुठे हि दिसत नव्हता. ‘डोंगरी’ या गावाचं किनार ऐकून 1200मीटर, हा बोर्ड मी मार्गलगत बघितला होता. शिवाय रस्त्यावरून एकही गाडी आमच्या लगत जाताना मला दिसली नाही. सुमारे ऐंशी किलोमीटर लांबीचा प्रवास आम्ही केला होता. पण पर्यटनस्थळ म्हणून जी अपेक्षा मनात राखली होती ती मात्र स्थळी पोहचताच भंग झाली. कुठे ही काही दिसत नाही. आम्ही दोघे रस्त्याच्या किनाऱ्याहून माहिती मिळावी म्हणून पुढे चालू लागलो. सुमारे 200 मीटर आम्ही दोघे काष्ठकोप्त (काठ-कोपरा बघणे) करत चालत राहिलो, आणि अचानक, आम्ही ‘डोंगरीसीमा 200 मी.समाप्त’ झाल्याचे काठचिन्ह पाहिले!

“अरे पूरब, गाव तर 1200.मी. विस्तृत आहे असं त्या बोर्डावर लिहिलं होतं नं, आणि हे तर काही भलतच इथे!”

“अरे हो यार, काही कळेनासं झालंय. इतका लांब प्रवास व्यर्थ गेला म्हणावा, ये गाव कसलं? फक्त जंगले दिसतंय इथे आणखी काही नाही.”

“समोरचा रस्ता देखील भयाण भासू लागतोय. हे जंगल आणखी गर्त होत जातंय! चल यार, वापस जाऊ.”

“नाही. आपण सर्वे पुढं जाऊ!,” मी उद्गारलो, “सर्वांना सांग की पर्यटनस्थळ पुढं आहे.”

“वेडा आहे का? खोटं का? अन समोर काय आहे काय नाही हे तरी माहित आहे का आपल्याला?” तो प्रश्नार्थक स्वार्थ उद्गारला.

“अबे ऐक! या जंगलात प्राणी आहे खरं! आपण एवढ्या लांबून आलो, जर वापस जाऊ तर काहीच मजा येणार नाही, सर्व व्यर्थ! जरा विचार कर, एवढं घनदाट जंगल, त्यात आपली स्वतःची गाडी फिरवून, कोणाचे ही बंधन न असता पूर्णपणे फिरू शकतो. कोणाचा बाप आपल्याला टोकणार नाही! अन कदाचित दैव पावला अन वाघ दिसला तर भाई!! किती मजा येईल!”

“हो यार! फुल पैसा वसूल!”

“मग!” मी म्हणालो, “एक काम कर, हा बोर्ड आधी तोडून देऊ! जर आपल्या आईनं हे बघितलं तर ते पुढं नाही येईल.”

आम्ही दोघांनी हे विचित्र आगाऊ कारस्थान केलं. अगदी सश्याच्या पावलाने माघे दक्षता ठेऊन त्या बोर्डाला उपडून आमचा मार्ग मोकळा केला. नि परत मागे परतून कुटुंबाला खोटी अपेक्षा देऊन समोर ज्याण्यास उत्सुक केलं. गाडी पुढं चालायला लागली. 200 मीटर असलेली डोंगरी गावाची रुंदी ओलांडली गेली, हे कुटुंबाच्या लक्षात आलं  नाही.

7

भयाण रुळावरून एकटं वाहन चालत होतं. पुढं काय असणार ये कोणालाच काही माहित न्हवतं. पळभरासाठी का होईना, पण माझं मलाच आश्चर्य वाटत होतं. आपण हे काय केलं, का केलं, कुटुंबाशी का खोटे बोललो हे प्रश्न तर दूरच राहिले,पण मी हे खुप मोठी चुकी केली आहे असं मला त्या क्षणी एकदा ही वाटलं नाही. आपण बेफिकीर आहो, निर्धास्त आहो, याचा मात्र मला अभिमान वाटे.

आता आम्ही सर्वे फार दूर निघून गेलो. अरण्य आणखी भयाण झाला होता. दुपारची वेळ होती. आकाशाच्या माथ्यावरून सूर्य हळू हळू मावळतिच्या क्षितिजाकडे झुकत होता. अर्धा तास आमचं वाहन तसंच चालत राहीलं, पण दृष्टीस काही दिसलं नाही. हे बघून आईला शंका अली. समोर रास्ता ख्रस्त झाला होता. डांबरी रास्ता अचानक कच्च्या रस्त्यात बदलून गेला.

“बस, थोडंच दूर! मग आलंच की पर्यटनस्थळ!” मी आणखी खोटं बोललो.

रास्ता आणखी अडथळ होत होता. थोडं पुढं जाऊन तो आणखी गुंत झाला. वातावरणाची शांतता तीव्र झाली, ते आणखी भयाण झाली! शेवटी वाहन चालत चालत जंगलाच्या गर्त भागी पोहचली असावी असे मला वाटले.

“अहो ताई, फार अंदर आलोय आपण! गाडी थांबवा जरा!” काकू चिंतेच्या स्वरात म्हणाल्या, “समोर आहे तरी काय? फक्त जंगलच दिसतंय!”

आईने गाडी जशी थांबवली, मी गाडीच्या बाहेर पडलो. बाहेर पडताच मला डाव्या बाजूला, झाडांनी गच्चं व्यापलेलं, आकाशाच्या दिशेत आमच्याहून शंभर पावलं दूर एका विशाल देउळाचं देऊळस्तंभ दिसलं.

“आई, ते बघ ते मंदिर!” मी उद्गारलो.

आम्ही सर्वे मंदिरात जण्याकरिता पावलं पुढं टाकू लागलो. कानात तो वनाचा किर्र बारीक गुंजर आवाज ऐकू येत होता. सोकलेल्या झाडांची सोकलेली विदीर्ण पर्णे साऱ्या जमिनीला घेरून, त्यावरून पायथ्याशी चालणाऱ्या माणसाच्या सूक्ष्म पावलांचा अतीसूक्ष्म आवाज देखील आम्हास ऐकवत होती. या आधी येथे कोणी गेलं नसावं हे स्पष्ट होतं. शंभर पावले चालून झाली, झाडा-झुडुपांच्या काटोऱ्या अंगाला न जुमानता, मंद मंद पावलं टाकीत, उत्सुकतेच्या भरात आम्ही जात होतो. पण अचानक, काय घडलं कोणास ठाऊक? चालून चालून पाय दमले, पण ते देऊळ आलेच नाही. आणि आश्चर्याची गोष्ट अशी होती की ते देऊळस्तंभ तसाच स्तब्ध, वृक्षापर्णानी झाकलेला, अर्धवट, दृष्टीस येत होता. ही घटना फार विचित्र आहे, पण सत्य आहे. चालून चालून अखेरीस आईचे आणि काकूचे पाय दमले, ते जागेवरच थांबले.

“चालणं नाही होत आहे रे दादा! काहीतरी विचित्रच वाटतंय मला. चला, वापस वळूया.” काकू म्हणाल्या.

“कोणतं राहू लागलं होतं नशिबी काय माहित!” आई चिडक्या स्वरात उद्गारली, “एवढं दूरहून अंगवणीने आलो, आणि दिसतंय काय? तर हे नुसतं झाडी-झुडुपं! चला, वापस चला! अंधार व्हायला जास्त वेळ शिल्लक नाही!”

निराशा घेऊन सर्वे परत जायला परतलो. आम्ही एवढ्या गर्त भागी आलो होतो कि तिथून वाहन दिसेनासं झालं होतं. आता पुढे आणखीनच काहीतरी विचित्र प्रसंग होऊ लागले. आम्ही ज्या मार्गाहून आमच्या वाहनाकडे परतायला निघालो, ते मार्ग तर भुरळ झालं! दिसेनासं झालं, अस्पष्ट धुक्याप्रमाणे! संध्याकाळ व्हायला किमान एक तास शिल्लक असावा, मार्ग आपण चुकलो आहो आणि या दाट जंगलात हरवलो आहो हे कळायला आम्हाला काही जास्त वेळ लागला नाही. तेजू देखील घाबरली होती. तिची शांत शीतल काय चिंतेच्या आवाक्यात गुंतून गेली होती. आदीला देखील भीतीचे कण स्पर्श होत होते. सर्वत्र गोंधळ झाला, मार्ग हरवील्याने मनाचा ताबा तुटून भयग्रस्त रूपात परिवर्तित होत होता. सर्वांच्याच भयग्रस्त कायेवर एकच प्रश्नचिन्ह पाताळीत गर्त झालेल्या खोल वृश्चिकाप्रमाणे दाटून आले. त्याचवेळी अचानक मिनं आपली नजर मागे वळवली आणि मी बघतो ते काय! तेच देऊळस्तंभ त्याच दुरीवर तसंच दिसून येत होतं! हे खरंच अकल्पित आहे, अविश्वसनीय आहे! “इथून परत

निघायला हवं! लवकर!" असें मला त्या क्षणी म्हणायला हवे होते, पण अपरिहार्य, असा कोणताही विचार मला त्या क्षणी उद्भवला नाही! उलट, "आता तर त्या ठिकाणी जायलाच पाहिजे, शहानिशा करायलाच पाहिजे!" असा विचार काळजाला भुरळ घालून गेला!

कधी कधी जिज्ञासूपणा, अतिनिर्धास्तपणा स्वतःच्याच दैवाला जाळीत अडकवून सोडतो. भयाण अरण्यात आम्ही सहा लोकं मार्ग विसरून अडकलो होतो. अश्या संकटाच्या वेळी काय करावे हे सुचेनासे झाले. आम्ही मार्ग शोधत आणखी समोर गेलो, तेव्हा कानांत खळखळ वाहणाऱ्या पाण्याचा आवाज ऐकू आला. "कदाचित इथे झरा असावा,पण हा आवाज समोरून येतोय!"

शांत वातावरणाच्या सूक्ष्म संगीतात पाण्याचा सरसरता नाद ऐकू येताच भयग्रस्त कायेवर उत्साहाची टिटवी फुलून आली!

"चला चला! ते समोर झरा आहे! चला, मज्जा येईल!" म्हणत आम्ही समोर निघालो. मी तेजूचा हाथ पकडला आणि 'सावध चल!' म्हणून तिला स्पर्शइशारा केला. थोडी पावलं समोर गेली आणि मग डोळयांना प्रकाशाची किरण दिसली!

सृष्टीचं आणखी एक भांबावून सोडणारं, मनाला भुरळ घालणारं ते आणखी एक अदभूत, विलम्य, सुंदर चित्र! फेसाळलेल्या पांढऱ्याशुभ्र जलाने आलंकृत झालेलं ते चित्र! पृथ्वीतळावर वाहणारं हे शीतल जल, जणू प्रेमळ डोळयांनी आकाशाकडे टक लावून बघत असावं, ज्याला आसमंतातील तरंगणाऱ्या भव्य ढगाळांनी पाहिलं! दोघांच्या नजरा एक-मेकांना स्पर्शल्या, तोच त्या क्षणी त्या दोघांमध्ये प्रेमाचा ओस जन्मला! मग हळू हळू ढगाने आपली रुंद भव्य काया विस्तृत केली आणि आपल्या

प्रेमाशी मिलन व्हावे म्हणून त्याने पृथ्वीतळावर झेप घेतली! त्या प्रेमात दोघांचे आलिंगन झाले, आणि त्यातूनच ह्या पांढऱ्याशुभ्र जलकणांची निर्मिती झाली असावी!

झरा बघताच उत्साहाला भान राहिला नाही. आम्ही सगळे पाण्यात खेळायला धावत सुटलो! पण एक व्यक्ती मात्र फार भीत होती!- तेजू! मी स्वतः तिचा हाथ पकडला नि तिला पाण्यात नेलं! पाण्याचा थंड स्पर्श झाला, नि मनावरचं सारं ओझं नाहीसं झालं! घटकाभर आम्ही पाण्यातच खेळत राहिलो, पण किनारीच! मधात पाण्याचा डोह आहे हे कदाचित आम्हला कळलं नाही! उत्साहाच्या नादात कोणी का दक्षता घेईल? आणि चंचल मन तर कधीच याचा विचार नाही करत. ‘दक्षता’, फारच सोप्प असं अर्थ असलेलं, पण जीवनाचं सर्वात भयाण, दुःखदायी, आणि पश्चातापाला  कारणीभूत! कदाचित, हा शब्द कुणाच्या जीवाचाही विचार नाही करत, तो कधीच दुसरा पर्याय शिल्लक नाही सोडत, न हि कुणाचं नातं बघत, अगदी निर्दय पाषाणाप्रमाणे!

होय, खरंच, अगदी खरं!

पाण्याचा प्रवाह अचानक गतिशील झाला! आभाळात मावळत्या सूर्याची किरणे देखील गच्चं दाटलेल्या ढगांच्या मागे लोप पावली.ही सांध्यची वेळ होती, जेव्हा मावळत्या सूर्यासह प्रकाशात न्याहाळलेले धरणीचे चराचर हळू हळू अंधाराच्या भयविस्तृत जगाकडे झुकू लागतात. पण अचानक वातावरणाने त्याचे रौद्र रूप धारण केले, ज्याकाळे

आमचं दुर्लक्ष होतं. पाण्याच्या आणखी आत जाऊन बघूया म्हणून आम्हा सर्वांनी उत्साहाच्या नादात धाव घेतली. मागून आई आणि काकूने सावध केले कि जास्त आत नका जाऊ, पण त्यांच्या शब्दाला आम्ही एवढा महत्त्व दिला नाही. पाण्याच्या आत खडतळ दगडांची भूमी होती, पाण्याच्या आत जशी-जशी आमची पावलं जात होती, भविष्याने लिहिलेलं काहीतरी भयाण, अदृश्य, आमच्या त्यास जवळ येत होतं. ना ना म्हणता आम्ही फारच खोल येऊन गेलो. माझी बहीण आणि आदी हे दहा पावलं माझ्या आणि तेजूच्या समोर होती. पाणी कंबरेपर्यंत आलं, तेव्हा….

“आणखी आत नका जाऊ,” तेजुने उद्गारलं.

“अरे तू का थांबली?” मी म्हटलं, “चल, ये न काही नाही होत!” हे वाक्य उद्गारताच अचानक! आभाळातून मेघांची क्रूर गर्जना ऐकू आली! क्षणभरातच पावसाची थेंबं अंगाला स्पर्श होऊ लागली! सरसारत्या वज्राप्रमाणे ढगांचे अंग चिरून वीज कोसळली! त्याच क्षणी पावसाचा प्रवाह वाढून गेला! कंबरेपर्यंत आलेल्या शांत पाण्याने अचानक भीषण डुलक्या घ्यायला सुरुवात केली! मागून आईच्या आणि काकूच्या ‘परत या! परत या!’ अश्या चिंकाळ हाका ऐकू येऊ लागल्या! आमच्या दोघांपासून दहा पावलं दूर गेलेल्या दोन व्यक्ती गर्त पाण्याच्या डोहाजवळ जाऊन पोहचली होती! ते मागे यायला वळले, पण खोल पाण्याने त्यांना आत ओढून घेतलं! पाणी इतकं वाढून गेलं की डोळ्यांना सर्व जग दिसेनासं झालं! मी आणि तेजू किनाऱ्याहून फार दूर नव्हतो, तरीपण त्या जागी

वाहत्या पाण्याने आम्हाला तिथून निघणे फारच कठीण केले होते! आभाळातून वीज कोसळली, काळीज धगधगू लागलं! प्राण- गतप्राण झाले! सर्वत्र भीती दाटली! अशी भीती, कि ज्याचं वर्णन करण्यासाठी आज मला शब्द अपुरे पडत आहे!

ते अंधुक प्रसंग आमच्या धुकेल्या डोळयांनी अस्पष्ट पाहिले! ज्यात आमचे दोन जीव, पाण्यातील साठलेल्या घसरी दगडावरून पाय घसरल्यामुळे सरळ डोहात बुडून गेले!.......नि…., नि, क्षणार्धात, या सुंदर जगातून, दोन सुंदर जीव, नेहमीसाठी, निघून गेले! त्या प्राणज्योत ...., लोप पावल्या!

आता ह्या हाका मारून काय उपयोग होता? त्यांना बोलवण्यात काही तथ्य होतं?????! शेवटी जे गेलं, ते कधी परत येतं का?, सांग ना!! ‘जे कधी गेलं, ते खरंच, कधी परत येतं का??’.

9.

क्षणात, एका पळभरात काय बदलू शकतं काहीच सांगता येत नाही. त्याला करणास्त आपण स्वतः असतो कि आपलं दैवं?

अजुनही तीच भीती, अजुनही तेच वातावरण, अजुनही तीच परिस्थिती होती. आभाळात ढग फुटून गेले, कासवीस वेगाने थेंबांची वृष्टी होत होती. आम्ही दोघे त्याच ठिकाणी, किनाऱ्याहून लांब पाण्याच्या मध्याल्प भागी उभे होतो. ते दोन क्षण जणू वर्तमान नाहीसे झाले होते. डोळयातून अश्रूंची सजल थेंबं पडे, पण ते ही हा निर्दय पाण्याचा दुष्ट प्रवाह आपल्या क्रूर हृदयाने भिजून काढी. त्या अश्रूंना देखील काही महत्त्व, काही तत्त्व त्यावेळी उरले नव्हते. उरले होते, ते केवळ शेवटचे, ते, ते किती क्रूर क्षण.., ज्यात या अंधुक डोळयांनी, या स्पष्ट कानांनी आपल्या दोन जीवांचे मृत्यू पहिले!

बघता बघता कंबरेपर्यंत साचलेलं पाणी अंगावर चढू लागलं! पाण्याचा वेग आणखी वाढू लागला! “सुन्न झालेल्या हृदयाने, त्याच क्षणी आपला जीव देऊन टाकावा! नको हे जीवन! आता काहीच उरलं नाही! हे सर्व व्यर्थ आहे! परमेश्वरा! हे सर्व व्यर्थ आहे!”

मला ते अस्पष्ट जाणवतं, पण असं, जे काळीज हलवून सोडीन! कारण, पुढे जे घडलं ते खरंच, असाधारण होतं, अकल्पित होतं!

10.

डोळे उघडले! कुठल्यातरी सर्द सावलीच्या छायेत, ओलसर जमिनीवर भिजून चिंब झालेले देह, निःपात पडून होते. हिरवळसर परिसरात सांध्य वेळेच्या उष्ण सूर्यकिरणांनी ओलस देहांना स्पर्श केले, तसे भान जागे झाले! माझे डोळे उघडले. डोकं गच्चं  झालं होतं. भूतकाळाचे ते अस्पष्ट दृश्य सतत डोळ्यांसमोर येत असे-

"नाही! नाही! वाचवा! कुणी वाचवा!"

"तेजू!!!!!...........,

"पूरब!!!!...........,"

मी जागेवरून उठू लागलो. इकडे तिकडे बघू लागलो. पण डोळ्यांसमोर मला फक्त सोनेरी किरणांनी आविर्भूत झालेलं आभाळ दिसे! मखमली रेशीमाचं पांढरंशुभ्र दडपण जणू आभाळाने आपल्या अंगाशी बिलगलं आहे, असा क्षणभंगुर भास त्या वेळी क्वचितच का होईना, मनाला सुखावून गेला, आणि सर्द वाऱ्याच्या थंड-कोवळ-मंद स्पर्शानं, शरीराशी द्वेगलेल्या उद्वेग वेदनांना थांब दिली, काहीतरी ओझं उतरलं, नि चौफेर पसरलेल्या उरीव नीरव गंधात मन मग्नमुग्ध झाले, असे वाटे! निसर्ग दुःखाला कसं नाहीसं करतं ना!

मी कुठे होतो, हे मला कळले होते. सोनेरी वातावरण, समोर ढगतरंग, मागे वृक्षपुष्पांनी बहरलेलं, सजलेलं असं पर्वतीय अरण्य! मी इथे

कसा आलो, हे मला ठाऊक नव्हतं, पण हे जग, हे वर्तमान, नि हे भवितव्य आता नक्कीच एका कल्पनाहून वेगळं नाही याची चाहूल क्षणोक्षणी, काष्ठाकोष्ठ मला झाली होती. किती सुरम्य जग होते ते, जिथे माझे मन खरोखरच कल्पनातरंगावर तरंगत होते, पण अश्या सुंदर जगात भूतकाळाची ती अदृश्य स्मृती पळोपळी मनाला कवलत होती.

11.

“तेजू!” वृक्षछायेत तिचे निःकत्प (मूर्च्छित) देह दिसले. मी चकित होऊन तिकडे वळलो!

“तेजू..!, त.. तेजू!” मी घाबरलो होतो. तिची मूर्च्छितावस्था बघून हृदय घाबरून आलं! काय करावे काही कळेना. मनात उलट सुलट विचार पिंगा घालीत होते. मी तिची श्वास तपासली, अजूनही हृदयात प्राण होते! क्षणाचीही ताबूत न बघता मी आपले श्वास तिच्या श्वासात भरले! त्याच क्षणी डोळयातून अश्रू भिजले, जे तिच्या डोळयांत जाऊन मिसळले. नि त्याच क्षणी तिने स्पर्श साधला. तिचा नाजूक हाथ मला स्पर्शला, माझ्या जीवात जीव आलं. नि त्याच क्षणी तिचे डोळे हळुवारपणे उघडले. त्या डोळयात मला फक्त दुःख जाणवले, फक्त दुःख! नि ते दोन अश्रू, जे किती काही सांगत असावे—ज्यांनी माझ्या हृदयाशी अबोल स्पर्श साधला, तीच भावना, तेच शब्द, तेच अश्रू आज या कागदावर अस्पष्ट आहेत, पण का? यामागील कारण का असावं? मी ते स्पष्ट का नाही करू शकतोय? छे! लिहिता लिहिता डोळेही  पाणावले!

ते अश्रू मला कडकडून बिलगले!, अगदी घट्ट!! त्या स्पर्शाने माझे देह वितळून गेले. भीती, भवितव्य, दुःख… या शिवाय त्या दोन जीवांमध्ये आणखी काहीच नव्हतं. अश्या नि:स्पश्य काळात त्या  दोन जीवांच्या नाजूक मिठीत सुख नव्हतं, पण जगण्याचं बळ मात्र मिळत होतं. किती क्षण

गेले हे काही कळलं नाही. आम्ही किती वेळ एक मेकांना घट्ट, अगदी घट्ट बिलगून होतो.

कधी कधी काळ काय खेळ खेळतो, काहीच समझत नाही. समझणारही कसं..? गोष्ट तीच समझू येते, जी प्रत्यक्ष घडते! कल्पना… हे शब्दापुरतच!

काय झालं असावं समोर? आम्ही कुठे होतो, तिथे कसे पोहचलो, पुढे काय झालं असावं? फार गुंतागुंतीचे प्रश्न आहेत हे, हो ना? खरं सांगू काय …? मला यातलं काहीच सांगायचं नाही, काहीच नाही. तुम्ही प्रत्यक्ष माणसं, सत्यतेत विश्वास ठेवणारी! जे घडू शकतं, तेच तुम्ही ऐकाल, बोलाल, विश्वास कराल. पण मी मात्र प्रत्यक्ष नाही…. मी…, जो हे भावबंध सांगतोय, तुमच्याशी बोल साधतोय… त्या दोन जीवांची कथा लिहितो य, तो या जगात नाही! होय, मी जा जगात नाही..!

घाबरलात का?

छे! खरंच घाबरलात?

माझे मन आज या शब्दांनी मोकळे होत आहे. कुठलंतरी ओझं नाहीसं झालंय असं वाटतंय! फार विचित्र आहे हे ऐकाला, समझायला, पण खरं आहे, हे प्रत्यक्ष आहे!

माझ्यासोबत चला …! या कथेला पूर्ण करा…., हे भावकल्प अपूर्ण नको…, अपूर्ण नको!

12.

देह एकमेकांत बिलगले होते. अश्रूंची धारा एकमेकांच्या अश्रूत घुळत होती. पाणावललं क्षण होतं ते….

मग तो काळ काही वेळ असाच स्तब्ध राहिला…, आणि ती दोन अश्रुतपूर्ण जीवं भानावर आली. ते घट्ट आलिंगन सुटून गेले.

“तेजू! तू…, तू ठीक आहेस ना?”

तिने एक क्षण माझ्या डोळ्यात पहिले, नि पुन्हा मला त्याच भीतीने, त्याच घाबरटीने कडकडून मिठी मारले! जीव रडत होतं, खूप रडत होतं. मी देखील तिला माझ्या घट्ट आलिंगनात विसावून घेतले. तो काळ पुन्हा तसाच स्तब्ध राहिला, अगदी हरपून गेला. काही वेळानंतर आम्हाला भान आले; आणि…..

“आपण कुठे आहो पूरब? आई कुठंय?” -अश्रुतपूर्णस्वर.

“काहीच कळत नाही आहे तेजू. हे सर्व काय होत आहे! कुठे आलो, कसे आलो, काहीच कळेनासं झालंय.”

“आपलं जीवन संपलं का रे?”

तिचा हा प्रश्न ऐकताच माझ्या जीवातून जीव सुटून गेलं. ती म्हणाली - “सांग ना पूरब, आपलं…, आपलं जीवन संपलं का रे? हे आयुष्य आपल्याशी काय खेळ खेळतोय?”

“खेळ!” मी विक्षुब्ध स्वरात बोललो “छे!....खेळ!.... ह्ह!.... तेजू, फारच गुंतक आहे हे सर्व. अरे आयुष्यच लत्तरातात गुंतलेल्या त्या

धाग्याप्रमाणे! बघ तरी, ज्या जागी आपण प्रत्यक्ष आहो, ती जागा तर बघ. किती सुंदर! किती विलम्य! पण मनात घोंगाळणारे हे प्रश्न…, हे अकल्पित काळ, हे दुःख.. जे क्षणो क्षणी मनाला सलत आहे, ते मात्र निरुत्तर का?? इथे सर्व काही आहे. हे अदभुत जग तर कल्पनाहून वेगळं आहे गं, पण आपलं जीव यात रमेनासं का?"

"कारण प्रश्न! तो भयाण पूर्वाभास, क्षणिक डोळ्यांत येतो, क्षणिक नाहीसा होतो, काहीतरी विचित्र पूर्वसत्य आहे, काहीतरीच आपल्यासोबत घडलं आहे, असं दृश्य या डोळ्यांपुढे येतं! पण पूर्ण काहीच आठवत नाही!"

"आपल्यासोबत आपली माणसं होती ना! ते …, ते….., ते मग…, कु.. कुठे गेली..?? मनात अस्पष्ट आठवण आहे, ते कदाचित सत्य आहे, प्रत्यक्ष आपल्यासोबत घडलं आहे, पण त्या आठवणीस तत्त्व का नाही? ते पूर्णपणे डोळ्यांपुढे उघडत का नाही आहे?"

"काय होत आहे हे!!!!!!!!? का आहे हे सर्व!!!!!!!!!!?" तिचे स्वर आभाळाला स्पर्श झाले!

अचानक! आभाळ गर्जना करू लागला! विजांचा कल्लोळ झाला, रुद्रावतार डोळ्यांसमक्ष प्रकट झाला! समोर भव्य पर्वत, ज्याच्या शिखराहून वाहत येणारं पाणी, नि त्या खळखळणाऱ्या पाण्यात प्रतिबिंबित, तो भूतकाळ आम्हाला दिसू लागला!

पूर्व.....

[तोच झरा, तेच भयाण वातावरण, तेच भूतकाळ जिथे पूरब आणि तेजू पाण्याच्या मध्याल्प जागी अडकले होते. आदी आणि पूरबची बहीण डोहात देह सरसावल्याने मृत्यूला बळी गेले होते. मग समोर काय घडलं हे त्या झऱ्यात दिसू लागलं.]

पाणी श्वासापर्यंत आलं! पाऊस आणखी वेगवान झाला! आभाळ आणखी दाटला!

तेजू- "पूरब, हाथ नको सोडू पूरब!"

पूरब- "तेजू, आता काय होईल! आपण इथे फसलो!!"

पाण्याचा प्रवाह आणखी वाढला! जीवन आणि मृत्यूच्या मधात फसलेले ते दोन जीव होते, ज्यांना जगायचं होतं, आयुष्य बघायचं होतं.... 'प्रेम करायचं होतं..., ते अपुरं राहून गेलं! अखेरचं शब्द हेच होतं- 'निसर्गा, आम्हाला जगायचं आहे. आम्हावर दया कर!" पण त्या क्रूर निसर्गाला काहीच दया आली नाही. ढग फुटून गेले! पाणी आणखी वाढला! तो इतका वाढला कि त्याने आपल्या प्रवाहाने त्या दोन जीवांना सरळ डोहात गिळून घेतले! नि क्षणात.., त्यांचं जीवन संपून गेलं...!

13 [शेवट]

डोळ्यांना विश्वास बसत नव्हता.

“हे जे आता मी प्रत्यक्ष पाहिलं, ते सत्य नाही ना? कि …, कि…”

“आपण या जगात राहिलो नाही पूरब!” [स्तब्ध होऊन ती समोर बघतच आहे]

“काय! म्हणजे…., आपण…., आपण मेलोय? मग हे देह, हा स्पर्श अजूनही का? ही अनुभूती, का? आपण दोघंच एकमेकांना का बघू शकतोय? या डोळ्यात अजूनही दुःख का??”

[क्षण पाणावले आहे. वातावरण हळू हळू खुलू लागले आहे. काळेकुट्ट ढगं सरसावले गेले, आसमान खुलले नि तारक्यांची सुंदर निशा उत्फुलून गेली आहे.]

“सांग ना तेजू!! या डोळ्यात अजूनही दुःख का? या हृदयात अजूनही भावना का?”

“विचित्र रे जीवन….., ह्ह! फार विचित्र” - विक्षुब्ध स्वरात - “आयुष्यही एक प्रश्नच! छे, काहीच नाही कळत. माणूस जीवन जगतो, तर ते जगण्यासाठी नव्हे, तर जीवनाशी संलग्न असलेल्या उत्तरहीन प्रश्नांचा शोध घेण्यासाठी! कोण आपलं, कोण परकं, प्रेम काय, द्वेष काय, नातं काय…, आपुलकी काय, या असंख्य प्रश्नांच्या वादळात ते जीवनपर्ण

कुठच्या कुठे निघून जाते. ते शोध घेते असते..., कारण शोधत असते, त्याला उत्तर हवे असते, पण ते काही केल्या त्याला आजीवन सापडतच नाही! ह्यालाच त जीवन म्हणतं कदाचित!"

"मृत्यू आला, जीवन संपलं... पण ते प्रश्न निरुत्तरच राहिले. ते घनदाट अरण्य, त्यातील देऊळस्तंभ.., तो झरा ..., ते विचत्र घटना..., का झाली, काहून झाली, ह्यांच्या उत्तरापासू आपण आजही निरुत्तरच!"

"छे! बघ तर! ते देऊळस्तंभ आता देखील समोरच दिसतंय!"

"राहू दे त्याला निरुत्तरच!"

"हो! राहू दे त्याला निरुत्तरच!"

"तेजू! निसर्गाने आपल्यात असं काय बघितलं गं?"

"आपण एक आहो, फक्त एक! आपल्या मिलनाने हे अकस्मान भरून जाईल! तारे नाचू लागतील! चंद्र गाऊ लागेल!"

"प्रीत, अशीच असते का?"

"कदाचित, अशीच!"

मग या वाक्यानेच ते दोघेही एक मेकांत मिसळून गेले! उडत उडत चंद्रजलाच्या झऱ्यात, ढगांच्या कुशीत मनसोक्त भ्रमण करू लागले. एक मेकांच्या ओठांत ओठ स्पर्शले, देहात देह मिसळले.., अगदी घट्ट.. नि आसमंतात लिपलीपणाऱ्या तारकांनी त्यांच्या आलिंगनात कुठलाही

बाधा, कुठलीही चेष्टा केली नाही! नि अखेरीस, सर्वभोवती पसरलेल्या सर्द वायूवर मंद पसरलेल्या गंधकोराने, मनसोक्त प्रणयेत बुडून गेलेल्या त्या दोन मृतजीवांना आपल्यात विलीन करून घेतले! नेहमीसाठी! अगदी घट्ट!!

*** समाप्त ***

“आयुष्य असीम पुष्पपरी गंध,
सर्व सुगंध, आसमंत|
जे कि स्पर्शिते रतीमय गंध,
वलय तरंग, अंतरीचे|
-प्रद्यूम

मनोगत!

फार छोटीशी कथा लिहिली, मन तृप्त झालं. ईसाहित्यावर प्रकाशित झालेलं हे माझं दुसरं पुस्तक…, एक भावबंध. या आधी ‘पुरु’ हि लघुकादंबरी मी प्रकाशित केली होती. ‘पुरु’ बाबत मला फारश्या गोष्टी कळाल्या. क्वचितच वाचकांनी त्याला वाचले, त्यावर मला प्रतिसाद दिला. एका लेखकाला आणखी काय हवंय!

ह्या भावकथेला मी आधी ‘तू’ असे नाव द्यायचे ठरवले. मग लिहिता लिहिता माझं मनपरिवर्तिन झालं. तुम्ही बघाल तर या कथेत कुठेही प्रेमाची परिभाषा आली नाही. प्रेयसीचे वर्णन करणारे अलंकार, भाव, मी अजिबात लिहिले नाही. मी लिहिलं ते निसर्ग! प्रीतकल्पना केली, स्त्रीकल्पना नाही! आणखी एक महत्त्वाची गोष्ट- काही शब्द वाचकांना नवीन असेल. छे, असेल काय, ते आहेच. वाचनात कुठलीही अर्थबाधा येऊ नये, एकूण एक शब्द वाचकांना कळला तर वाचन हे संतुष्टीचं सुवर्ण मार्ग होते!

‘नर्मिष’ हा शब्द कल्पनेतून उद्भवला आहे. त्याचा अर्थ देखील कल्पनेतून आला आहे. त्याची सार्थ परिभाषा, मूळ व्याकरण हे कुठल्याही संदर्भाशी संलग्न नाही.

‘सौम झाले’ म्हणजे ‘शांत झाले’ असा ध्यानी घेतला तर ते उत्तम!

मला आजच्या modern trending love stories जिथे अत्यापरी आकर्षण होतो, शब्दानुशब्द केवळ स्त्रीचं रूपसौंदर्यच लिहिलं जातं, कुठलं तरी कॉलेज जिथे एक सर्वात सुंदर मुलगी आहे, तिला बघताच मुलाला प्रेम होऊन जातं, तो तिच्यासाठी काही पण करू शकतो, आणि मग शेवटी कुठलंतरी वयक्तिक मुद्द्याला, नंतर समाजाला त्यांच्या प्रेमाच्या मधात शत्रू म्हणून उभं केलं जातं. हेच आपली love stories!


मी अश्या कल्पना करण्यास समर्थ नाही. ते का, हे देखील मला माहित नाही. असो. हे भावबंध मी पूर्णपणे मांडू शकलो नाही असं मला नेहमी वाटत असतं. कुठेतरी, काहीतरी आपण विसरलोय, कल्पनेला ती प्रत्यक्ष भावना नाही देऊ शकलोय, हे मला ठाऊक आहे. या मागील कारण असं कि जीवनात मला कधी प्रेम नाही झाले. एकदा झाले होते, पण जिच्याशी झाले, ते आज माझा राग करते. का राग करत असावी ती, हे जर मला कळले असते न तर माणसाचं मन कसं असतं हे सत्य लिहायला देखील मी समर्थ झालो असतो.

असो. एक लेखक म्हणून मला फक्त वाचकांचा प्रतिसाद हवा आहे, आणखी काही नाही. पुरुचे लेखन कार्य आणि संदर्भसोध सध्या सुरु आहे. प्रयत्न चालले आहे. लवकरच एक भव्य कादंबरी प्रत्यक्ष स्वरूपात मराठी साहित्याला अर्पण होईल!

आभार! 🙏🙏🙏

प्रद्युम चिलकेवार , 27-2-2022!

प्रद्युमचे हेही पुस्तक छान आहे. क्लिक करा आणि वाचा.



**कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?**

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?
खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!
थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.
ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.
एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग
दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग
थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय
कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा.

आनंद घ्या. आनंद द्या.

Whatsapp: 9987737237

www.esahity.com

esahity@gmail.com